लोकमत

# पोस्टकार्ड लिखित संवादाचे प्रभावी माध्यम : कुलगुरु

## 'पोस्टकार्ड मोडी पत्रे', 'क्रीडा विश्व'चे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पूर्वीच्या काळी पोस्टकार्ड हे दैनंदिन जीवनातील एक घटक होते. लिखित संवादाचे प्रभावी माध्यम म्हणजे पोस्टकार्ड होय. लेखनाचे खरे धडे पोस्टकार्डच्या माध्यमातून मिळाले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

कपिलतीर्थ मार्केटमध्ये महालक्ष्मी धर्मशाळा येथे उदयसिंह राजेयादव लिखित शंभर वर्षापूर्वीची पोस्टकार्ड मोडी पत्रे, क्रीडा विश्व (मोडी लिपी भाग २) या दोन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, मोडी लिपीच्या माध्यमातून इतिहासाला उजाळा देता नव्या पिढीसमोर येत आहे. तत्कालीन व्यवस्थेमधील समाजजीवनाचे संबंध समजण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

याप्रसंगी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. प्रताप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच मोडी लिपी प्रशिक्षण वर्गामध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल ऐश्वर्या ऐताळ हिचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मीरा उत्पात-ताशी यांनी स्वागत, विजय जाधव यांनी प्रास्ताविक, तर आदित्य म्हैंदर्गीकर यांनी सूत्रसंचालन केले. अशोक सडोलीकर यांनी आभार मानले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



# युवा महोत्सव १८ सप्टेंबर रोजी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव यंदा १८ सप्टेंबर रोजी फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणार आहे. जिल्हास्तरीय महोत्सवास १८ सप्टेंबरपासून सुरुवात होणार असून कोल्हापूरसाठी जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेजला यजमानपद मिळाले आहे. सांगली जिल्हास्तरीय महोत्सव २० सप्टेंबर रोजी ऐतवडे खुर्द येथील वारणा महाविद्यालयात तर सातारा जिल्हास्तरीय महोत्सव देऊर येथील संभाजीराव कदम महाविद्यालयात होणार आहे. युवा महोत्सवासाठी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येणार आहे. युवा महोत्सवाची प्रवेशिका ९ सप्टेंबरपर्यंत विद्यार्थी विकास संचालक कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव १८ सप्टेंबरपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवास दि. १८ सप्टेंबरपासून प्रारंभ होत आहे. जयसिंगपूर येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगकडे कोल्हापूर जिल्ह्याचे यजमान पद आहे.

विद्यार्थी विकास विभागातर्फे युवा महोत्सवाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीसाठी उपलब्ध आहे. युवा महोत्सवात मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी ३२ तर जिल्हास्तरीय १४ कलाप्रकार असणार आहेत. गायन, वादन, लोककला, लोकनृत्य, एकांकिका, भारतीय समूहगीत, मूकनाट्य, लघुनाटिका, पथनाट्य यांचा समावेश असणार आहे.

> सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठाची टीम यजमान महाविद्यालयास भेट देऊन सूचना करणार आहेत. उणिवा दूर करून महाविद्यालयास मदत करण्यात येईल.
>
> **- डॉ. आर. व्ही. गुरव,**
> संचालक, विद्यार्थी विकास विभाग.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रश्नमंजुषा स्पर्धा शनिवार (दि. १४) सप्टेंबर रोजी त्या-त्या जिल्ह्याच्या ठिकाणी होणार आहे.

# विद्यापीठ घेणार २९ ला फेर प्रवेश परीक्षा

उजळाईवाडी, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या चार अभ्यासक्रमांच्या १९३ जागा अद्याप रिक्त आहेत. यासाठी २९ ऑगस्टला फेर प्रवेश परीक्षा होणार आहे. शिवाजी विद्यापीठ कॅम्पस, आष्टा, सातारा, भारती विद्यापीठ (कोल्हापूर) या ठिकाणी ही परीक्षा होईल. एम. ए. मराठी, एम. एस. सी. टेक मॅथॅमॅटिक्स, एम. ए. (एम. एस. सी.) भूगोल, कंम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमांसाठीही ही फेर परीक्षा होईल. १४ ऑगस्टला न झालेली प्रवेश प्रक्रिया २३ ऑगस्टला होणार आहे. एम. ए. मराठी, एम. एस. सी. टेक मॅथॅमॅटिक्स, एम. ए. (एम. एस. सी.) भूगोल, कंम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमांच्या तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयातील १९३ जागा रिक्त आहेत. यासाठी गुरुवारी (ता.२९) ला प्रवेश परीक्षा होईल. काही अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा होऊन अंतिम यादीही जाहीर झाली होती. १४ ऑगस्टला त्यांची प्रवेश प्रक्रिया होणार होती.